नाही लवाडी लताडी नीट फुटलेली वाट
नच होऊ दिले त्याने त्याचे जगणे बोभाट ४

याचा अर्थ असा की, सरळ साधी भोळी विचारसरणी असणारा नामदेव शेतकरी. त्याचे कुटुंबावर नित्तांत प्रेम आहे. वडीलधाऱ्यांचा आदर आणि सांभाळ करणे, आपले आद्य कर्तव्य आहे याची मानवी मूल्य जाणिव तो जोपासतो. कृषी जीवनाचा हाच तर खरा पाया आहे.

**गाव हाकेच्या अंतरावर या संग्रहातील व्यक्तीरेखा :**

गाव हाकेच्या अंतरावर असले तरी शहर व ग्रामीण हे अंतर कधीच न तुटणारे. कधीच ते एकमेकाला उपायोगी पडून मानवतेचा प्रत्यय आणून देणारे झालेले आहे. असे आतापर्यंतच्या इतिहासात तरी घडलेले नाही व येत्या काही वर्षात तरी असे घडू शकेल, असे वाटत नाही. म्हणून कवीमन व्याकूळ होते. विरोधाभास अन् अन्याय पाहून व्यतित होते. ते परिस्थिती सापेक्ष तुलना करू लागते, संगती लावू पाहते आणि यातील विसंगती, अन्याय, शोषण, मतलबीपणा पाहून बंड करून उठते. म्हणून कवीला सळसळणाऱ्या पिंपळ पानात बुद्ध दिसू लागतो. मन शोध-प्रतिशोधाच्या खाईत लोटून अनेक प्रश्न विचारू पाहते. क्षोभ, शोध नि क्षोत यांची मांडणी करू लागते. म्हणून गाव हाकेच्या अंतरावर या कवितासंग्रहातील हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

गाव हाकेच्या अंतरावर या काव्यसंग्रहाच्या संबंधात प्र. श्री. जाधव म्हणतात की, 'मनातून विसरावं म्हटलं तरी न विसरता येणारं बालपण आणि दाहक परिस्थिती परंपरेला चिकटून बसलेला गाव, संवेदनाशुन्य झालेली माणुसकी, सरकारी धोरणे, पावसाचा अनियमितपणा, शेतीत होत जाणारी नापिकी याला कंटाळून जाऊन कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करू धजणारा शेतकरी इत्यादी पाहून संवेदनशील वृत्ती जोपर्यंत शाबूत आहे तोपर्यंत तरी कवीमन शब्दासाठी अडून बसत नाही. मांडणी जुळत राहते. आपसूक शब्दच अनेक विविध रुपात व्यक्त होऊ लागतात. भावआशय सहज व्यक्त होत जाणारा, ग्रामीण तत्त्वाचा वारसा लाभलेला नि अनुभूती संपन्न असलेला हा संग्रह म्हणजे गाव हाकेच्या अंतरावर होय.'५ गावाच्या मातीला हाक मारणारे कवीमन आठवणीचे उसासे शब्दबद्ध करताना सर्वच शेतीमातीच्या लेकरांना जगदीश कदम यांचे काव्यविश्व आपलेच वाटू लागते. कारण गावच्या मातीचा गंध करोडो लोकांच्या जन्मसंदर्भाना जुळलेला असतो. आधीच्या काळातील दानेदळण आणि चिमण्यांनी भरलेले अंगन कविच्या गावात पारखे झाले. चिमण्या उडून गेल्या. अंगण दुष्ट की चिमण्या लबाड या भिजलेल्या कोड्याचे उत्तर जगदीश कदम यांना मिळाले नाही, परंतु या कवितासंग्रहामध्ये मायीची व्यक्तिरेखा साकार करताना जगदीश कदम लिहितात की,

कोसळणाऱ्या उभ्या आडव्या पावसाने मायीची उडालेली तारांबळ



आजही जखमेसारखी ठणक राहते मनाच्या खोल कपाऱ्यात.६

याचा अर्थ असा की, हा ठणकणारा कोपरा घेऊनच आजही कविला जगणे अपरिहार्य आहे. जगदीश कदम यांच्या बालपणाची वेदना बहुआयामी आहे. लाख मुंग्याचं बाळांतपण करून थकलेल्या आणि उंदरांनी कुरतडून टाकलेल्या चिंदकासारखे हे बालपण आठवताना कविला असाह्य वेदना होतात. हे बालपण केवळ कविचे नसून समस्त कुणब्यांच्या पोरांचे आहे.

**समारोप:**

जगदीश कदम यांनी आपल्या कवितांमधून दारिद्र्यविषयक, कृषीविषक, निसर्गविषयक, सामाजिक आदी जाणिवांचा आविष्कार केला आहे. कलावंत हा सामाजिक जीवनातील महत्त्वाचा भाग असतो. ग्रामीण कवी या नात्याने जगदीश कदम यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून समकालीन समाज वास्तवाला समोर ठेऊन आपले लेखन केले आहे. सोशिक ग्रामीण समाजाला आत्मभान प्राप्त करून देणे व त्यांचा आत्मविश्वास वाढविणे या भूमिकेतून जगदीश कदम यांनी लेखन केलेले दिसते. जगदीश कदम यांच्या कवितेतून शेतकरी हा शेती कसणारा, शेतीवर निष्ठा ठेवणारा असल्याने शेतीवर जीवापाड प्रेम करीत असतो. शेतीवर साऱ्या जगाची पोटं भरली जातात, परंतु शेती करणारा हा वर्ग अर्धपोटी, अर्धनग्न राहतो. शेतकरी हा कमालीचा सहनशील आहे. त्याला त्याच्या परिस्थितीची जाणिव करून देणे आवश्यक आहे. जगदीश कदम यांच्या कवितेने ग्रामीण जीवनवास्तव जीवंतपणे साकार केले आहे.

**संदर्भसूची :**


१. कदम जगदीश, रास आणि मोंडर, निर्मल प्रकाशन, नांदेड, २००८, पृ. १९
२. कदम जगदीश, आडमाती, निर्मल प्रकाशन, नांदेड, २००३, पृ. ३५ पांचाळ संजीवकुमार व जाधव संध्या (संपा.), डॉ. जगदीश कदमः व्यक्ती आणि
३. वाङ्मय, समीक्षा प्रकाशन, नांदेड, २०१६, पृ. ९३
४. कदम जगदीश, नामदेव शेतकरी, निर्मल प्रकाशन, नांदेड, २००६, पृ. १३
५. पांचाळ संजीवकुमार व जाधव संध्या (संपा.), उपरोक्त, पृ. ११९ कदम
६. जगदीश, गाव हाकेच्या अंतरावर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१४, पृ. ३६


***

या काव्यसंग्रहातून ग्रामीण भाषेचे अस्सलत्व नाट्यमय चित्रणातून, वेदनेतून, चित्रणातून व्यक्त झालेल्या दुष्काळातून, शब्दकळा, प्रतिमा, प्रतिकांमधून, स्त्रीविश्वातून, प्राणीविश्वातून व्यक्त होते. यातील संवेदनशील मनाने टिपलेले जीवनानुभव मनाला सुन्न व अस्वस्थ करतात. कवितेतील प्रतिमा सघन असलेली ही कविता आहे. जगदीश कदम यांच्या कवितेतील व्यक्तीरेखा ह्या ओढून ताणून आणलेल्या नाहीत तर तो वेदनेचा हुंकार आहे. ही वेदना त्यांनी आपल्या व्यक्तिरेखांतून प्रकट केली आहे.

जगदीश कदम यांनी 'रास आणि गोंडार' हा कवितासंग्रह कवितेला जीव कसा लावावा ते शिकविणाऱ्या गुरुवर्य भु. द. वाडिकर, भगवंत क्षीरसागर आणि सुधीर रसाळ यांना अर्पण केला आहे. यावरून असे दिसते की, त्यांच्या कवितेत आलेल्या व्यक्तीरेखा ह्या कशा जीवंत पद्धतीने असणार आहेत याचे प्रकटीकरण होते. जगदीश कदम यांच्या 'बैल' या कवितेतून धुरकरी यांची व्यक्तिरेखा विशेष भावून जाते. ते व्यक्तिरेखेसंदर्भात लिहितात की,

'मुक्या बैलांच्या भावना डोळ्यातून पाझरती
काळजाला छेडणाऱ्या कथा कोणत्या सांगती
गेला कसा धुरकरी एकाएकी दूर गावा
घरामधी चाललेला माय-लेकरांचा धावा."[1]

या कवितेमध्ये धुरकरी जाण्याने व्याकूळ झालेल्या बैलांचे डोळे पाझरताना दिसतात. कंबरेला विळा खोचून डोक्यावर गवताचा भारा आणणारा धुरकरी बीज कोसळून जमिनदोस्त होतो. असाह्यपणे ही घटना पाहणारे त्याच्या कुटुंबातील बैलांना मग चारापाणी कसा गोड लागावा.

**'झाडमाती' या कविता संग्रहातील व्यक्तीरेखा :**

महात्मा फुलेंनी शोषणाविरोधात संघर्षाची रेषा विद्या विरुद्ध अविद्या अशा स्वरूपात मांडलेली होती. भटशाही विरुद्ध कुणबी हा लढा त्यांनी हयातभर लढविला. काळ गती प्रमाणे आज भटशाहीचे चेहरे बदलत गेले आणि शोषण मात्र थांबलेले नाही. म्हणूनच शोषणव्यवस्था जोपर्यंत कार्यरत आहे तोपर्यंत ग्रामीण साहित्याचे अस्तित्व कायम राहणार आहे. जगदीश कदम यांचा 'झाडमाती' हा काव्यसंग्रह २००३ साली प्रकाशित झाला. या कवितासंग्रहामध्ये कुणबिकीच्या कविता आहेत. तथापि, बदलणाऱ्या ग्रामीण समाजाला आत्मभान देणारी कविताही आहे. आजच्या कवितेत दीर्घ-प्रदीर्घ खंडप्राय कवितेची परंपरा निर्माण होत असताना अल्पाक्षरत्वाचा प्रयोग परिवर्तनशीलतेचाच भाग असावा असे वाटते.

जगदीश कदम यांच्या कवितेतून शेतकऱ्यांचं दुःख, कष्टकऱ्यांच्या भावना व्यक्त झालेल्या आहेत. म्हणजेच जी शोषणव्यवस्था ज्यावेळी नष्ट होईल, त्यावेळी शोषणमुक्त असा समाज निर्माण होईल आणि प्रत्येकाला आपल्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळेल. परंतु शेतातील उत्पादीत झालेल्या



मालाला काय भाव द्यावा तो दलाल ठरवित असतो. ही पूर्वापार चालत आलेली प्रथा बळीराजाला मात्र दारिद्र्यात लोटत असते. 'बळीराजा' हा शब्दही आता उपहासाने वापरला असे वाटण्यासारखी शेतकऱ्याची परिस्थिती झाली आहे. नावालाच राजा पण घरी मात्र दारिद्र्य असा हा शेतकरी आपल्या कष्टाला बांधलेला आहे. 'बळीराजा' या कवितांतून बळीराजाची व्यक्तिरेखा साकारताना जगदीश कदम म्हणतात की,

'नाही फिटता फिटत जाते वाढतच रीण
नावालाच बळी राजा त्याचं धसकटाचं जीण, [2]

म्हणजेच बळीराजाचं नुसत नावाच राजासारख घ्यायचं, त्याच्या पदरी मात्र प्रचंड सावकारी व सरकारी कर्ज डोक्यावर बसलेलं असतं. शेतातलं ज्या पद्धतीनं धसकट असतं त्यासारखीच अवस्था या बळीराजाची झालेली आहे, अशी प्रत्ययकारी भूमिका जगदीश कदम यांनी या कवितेतून मांडली आहे..

**'नामदेव 'शेतकरी' या काव्यसंग्रहातील व्यक्तिरेखाः**

जगदीश कदम यांची नाळ जशी रास आणि गोंडार यांचा आलेख मांडून झाड मातीशी नाते सांगते तसे नामदेव शेतकरी यांच्या वेदनेशीही जवळीकतेचे नाते सांगते. नामदेव शतकरी हा काव्यसंग्रह (दीर्घकाव्य) आधुनिक शेतकऱ्यांच्या जनजीवनाचा दाहक आविष्कारच होय. पावसाचे आखडते हात आणि शासनाचा कानाडोळा, त्यात सावकाराचे शेतकऱ्यांच्या गळ्याला आवळणारे फास या परिस्थितीमुळे हतबल झालेल्या नामदेवासारख्या असंख्य शेतकऱ्यांच्या वेदनेचा उद्रेक म्हणजे नामदेव शेतकरी हा काव्यसंग्रह होय. यासंदर्भात डॉ. भारत कचरे म्हणतात की, 'नामदेव शेतकरी हे दीर्घ प्रयोगशील काव्य असून, शेतकऱ्याच्या वेदनेचा एक दस्तऐवज म्हटले तरी वावगे ठरू नये. कवीने सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत जी लय पकडली होती ती शेवटी मुक्त छंदातील शेतकऱ्याच्या संवादकाव्यात हरवलेली दिसते. जगण्याची लयही तेथेच संपते. कवीने काव्यरचनेच्या बाबतीत अष्टाक्षरी रचनेचा प्रयोग यशस्वीपणे हाताळून नामदेव शेतकऱ्याची वेदना समर्थपणे मुखर केलेली दिसून येते.[3] म्हणजेच नामदेव शेतकरीमधून आविष्कृत झालेल्या जाणिवांच्या आधारे या संग्रहाची मीमांसा करता येईल. नामदेव शेतकऱ्याची अवतीभोवतीची समाजस्थिती, त्याची जगण्याची रित, कष्ट, श्रमाचं चुकलेलं गणित, नामदेवाची पतप्रतिष्ठा, त्याची भक्ती आणि फितूर झालेली व्युत्त शक्ती, मायबापाच्या ऋणाची जाण अन् शेतीत राबताना गायी-गुरे या मुक्या प्राण्यांच्या जिव्हाळ्याचे भान अशा कृषी जाणिवांना अंतरात जोपासणारा नामदेव शेतकरी त्यांच्या दुःख संवेदनासह उभारण्यात जगदीश कदमांची प्रतिभा पणास लागल्याचा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही. यासंदर्भात जगदीश कदम लिहितात की,

# जगदीश कदम यांच्या कवितेतील व्यक्तीरेखा

प्रा. गोरोबा शेषराव रोडगे

प्रमुख, मराठी विभाग, शिवनेरी महविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि. लातूर

प्रस्तावना:

मराठी ग्रामीण कवितेमध्ये कवी म्हणून जगदीश कदम यांचे नाव आज परिचित आहे. ग्रामीण वास्तवाचे -बदलत्या स्थिती-गतीचे त्यांनी केलेले आविष्कारण मनाला भिडणारे आहे. शेती, शेतकरी, शासन, दलाल, खेड्यातील दारिद्र्य, निसर्गाचा लहरीपणा, भूख, मतभेद, गटबाजी, राजकारण, नातेसंबंध, शिक्षणाचे येणारे संदर्भ हे सर्व काव्यमय रूपात समोर येताना वाचकांना विचारप्रवृत्त करावयास लावणारे आहेत. कारण ही कविता ग्रामीण जीवनाचे वास्तव साकार करते. हे जीवन काव्यमयरित्या व्यक्त झाल्याने ग्रामीण जीवनाची खोली आणि व्यापकता लक्षात येते. जगदीश कदम यांचे अनुभवविश्व व त्यांनी साकार केलेल्या कवितेतील महत्त्वाच्या व्यक्तीरेखा. या व्यक्तीरेखांतून विविध जाणिवा साकार झालेल्या आहेत. जगदीश कदम यांनी 'रास आणि गोंडार', 'झाडमाती', 'नामदेव शेतकरी', 'गाव हाकेच्या अंतरावर' हे कवितासंग्रह प्रकाशित केले आहेत. या कवितासंग्रहातून त्यांनी साकार केलेल्या व्यक्तिरेखांचा आपण पुढीलप्रमाणे विचार करू.

**'रास आणि गोंडार' या कवितासंग्रहातील व्यक्तिरेखा :**

'रास आणि गोंडार' हा जगदीश कदम यांचा ग्रामीण कवितेचा संग्रह ग्रामीण कवितेमधील एक अतिशय संवेदनशील व ग्रामीण जीवनाचे वास्तव प्रकट करीत करीत झालेल्या व होत असलेल्या अंतरबाह्य परिवर्तनाचा व जीवनाचा एक वेदनामय पट आहे. ग्रामीण जीवन दिवसेंदिवस बदलते आहे. औद्योगिकीकरणाने खेडी ओस पडून शहरे खचाखच भरत आहेत. शहरांच्या निवाऱ्याला आल्यानंतर ग्रामीण माणसात पडत जाणारे अंतर खेड्यातील आई-वडिलांचा मुलांवर असलेला जीव, पती-पत्नीचे असलेले नाते, आई, मुलगा, वडील यांच्यामध्ये प्रसंगानुरूप उदभवणारे वाद, भावा भावांमध्ये शेतीबद्दल निर्माण होणारे वितुष्ट, मातीवर निस्सीम प्रेम करणारा शेतकरी व त्यांचे प्राणीविश्व, स्त्रियांच्या मनाच्या विविध भावावस्था, शेती, शेतकरी, त्यातून त्याची उपजिविका आणि वास्तवता याचं प्रत्ययकारी चित्रण अस्वस्थतेतून आणि वेदनेतून आविष्कृत होताना ही कविता आपल्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून स्वतःचं अस्तित्व व वेगळेपण प्रकट करते.

**ISBN No. 978-81-953976-4-8**

२००० नंतरची कविता : स्वरूप आणि आकलन

संपादक

डॉ. मारोती कसाब

सहसंपादक

डॉ. अनिल मुंढे

प्रकाशक

सिद्धी पब्लिकेशन हाऊस

६२४, बेलानगर, भावसार चौक,

तरोडा (खु.) नांदेड - ४३१ ६०५.

मो. ९६२३९७९०६७

मुद्रक

अनुपम प्रिंटर्स, श्रीनगर, नांदेड.

मो. ९१७५३२४४३७

प्रथमावृत्ती : २६ नोव्हेंबर २०२१

सर्वाधिकार : महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

मुखपृष्ठ : संतोष घोंगडे

अक्षरजुळवणी : डॉ. राजेश उंबरकर

मूल्य : ३००/-

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | संपादकीय मनोगत | डॉ. मारोती कसाब<br>डॉ. अनिल मुंढे | ०६ |
| ०२. | प्रस्तावना | प्राचार्य डॉ. वसंत बिरादार | ०८ |
| ०३. | '२००० नंतरची मराठी कविता' | प्रा. डॉ. प्रतिभा सुरेश जाधव | १७ |
| ०४. | "प्रकाशपर्वाचा साक्षीदार असलेली उजेडाची कविता" | डॉ. युवराज मानकर | २६ |
| ०५. | कवी भाऊ भोजने यांचा 'निळा प्रक्षोभ' | डॉ. शत्रुघ्न जाधव | ४० |
| ०६. | 'संदर्भ शोधताना' कवितासंग्रहातील कवितांमधून येणाऱ्या सामाजिकतेचा अभ्यास | प्रा.उन्मेष शेकडे | ५० |
| ०७. | स्त्री साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी आणि २००० नंतरच्या कवयित्रींच्या कवितेतील आत्मभान | प्रा. गौतम गायकवाड | ५७ |
| ०८. | गावगाड्याचा बदलता अवकाश शब्दबद्ध करणारा काव्यसंग्रह: 'बोलावे ते आम्ही' | डॉ.सुरेश शिंदे | ७३ |
| ०९. | सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा काव्यसंग्रह : आरंभबिंदू | डॉ. पंजाब शेरे | ८० |
| १०. | विषमतेविरूद्ध बंड पुकारणारी कविता: 'आता क्रांती दूर नाही' | डॉ. संतोष चंपती हंकारे | ८८ |
| ११. | जगदीश कदम यांच्या कवितेतील व्यक्तीरेखा | प्रा. गोरोबा शेषराव रोडगे | ९७ |
| १२. | २००० नंतरच्या आदिवासी कवितेतील भाकरीचे प्रश्न | डॉ. राजेश धनजकर | १०२ |
| १३. | २००० नंतरच्या कवयित्रींच्या कवितेतील जागतिकीकरणाचे चित्रण | डॉ. रामकिशन दहिफळे | ११० |
| १४. | २००० नंतरच्या ग्रामीण कवितेचे बदलते स्वरुप | डॉ. संजय खाडप | ११९ |

'२००० नंतरची कविता : स्वरूप आणि आकलन' हे डॉ.मारोती कसाब व डॉ. अनिल मुंढे यांनी केलेले संपादन म्हणजे उत्तम असा संदर्भग्रंथ. अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाशित होत असलेला हा ग्रंथ म्हणजे समकालीन मराठी कवितेचा सर्वांगाने घेतलेला वेध आहे. तथापि समकालीन काव्यसमीक्षा प्रांतातील महत्त्वाचे दस्ताऐवजीकरण असेही आपण म्हणू शकतो. या ग्रंथातील लेखांमधून कृषक समाजजीवन, स्त्रिया, जागतिकीकरण, गावगाडा, उपेक्षित-वंचित समूहाचा उद्गार, मानवी जीवननिष्ठा, नीतीमूल्ये हरवलेला समाज, तुटत चाललेला संवाद, स्वार्थांध वृत्तीशी संघर्ष, मध्यमवर्गीयांची संवेदनशून्यता, आधुनिकतेची प्रतिमा-प्रतीके-चिन्हे यांची व्यामिश्रता,वैविध्य दिसून येते. ही व्यामिश्रता वास्तवदर्शी आहे. त्यात समकालाचे बोलके प्रतिबिंब स्पष्ट दिसते. या लेखांतून एकूणच मराठी कवितेतील स्थित्यंतरे अधोरेखित होतात. एकंदर 'कविता हे भावना,कल्पना मांडण्याचे माध्यम असतेच; पण विषमतेविरोधात बंड पेरणारे, वास्तव रेखाटणारे, विवेक जागृत करणारे एक सशक्त माध्यमही असते.' हे २००० नंतरच्या काव्यलेखनाबाबत म्हणावे लागेल.

कारण-

'कविता केवळ नाही गाणे
कविता केवळ नाही लिहिणे
कविता असते कालपटावर
जगणे आपुले कोरीत जाणे!

'मराठी साहित्य समीक्षेच्या प्रांतातला महत्त्वाचा दस्तावेज वाचकांच्या हाती दिल्याबद्दल संपादकांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील यशस्वी वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा..!

-डॉ. प्रतिभा जाधव
(समीक्षक,साहित्यिक, स्तंभलेखिका, वक्ता, एकपात्री कलाकार)
लासलगाव जि. नाशिक

SIDDHI
PUBLISHING HOUSE
(National Publication)
Nanded, Maharashtra (India)
website : www.wiidrj.com

9 788819 97548

# २००० नंतरची कविता स्वरूप आणि आकलन



संपादक
डॉ. मारोती कसाब

सहसंपादक
डॉ. अनिल